केंद्रसरकार का सुचना का अधिकार-२००५

पत्र - ३

सुचना प्राप्त करने हेतु आवेदन पत्र

प्रती ,

जन माहिती आधिकारी

मीरा भायंदर महानगर पालिका

१) आवेदक का नाम - हाजी शेख (राष्ट्रीय अध्यक्ष - भारतीय मानवाधिकार परिषद)

२) आवेदक का पता - एच.आर.सी. भवन, क्यू मंजिल, वेस्टर्न एक्सप्रेस हाईवे, होटल अमर पैलेस के बाजुमें, मीरा रोड ईस्ट, ठाणे - ४०११०७

३) आवश्यकजानकारी का वर्णन :

1.मीरा भायंदर महानगर पालिका के हर नगरसेवक को सालाना कितना रक्म मिलती है काम करने हेतु

2 वह रक्म किस काम मे उपयोग होना चाहिए

3 मीरा भायंदर महानगर पालिका हर नगरसेवक को कितनी सेलेरी देती है

4 मीरा भायंदर महानगर पालिका मे कितने कर्मचारी है और उनकी तनखा है उस की पूरी जानकारी दिजाये

४) सूचना पोस्ट द्वारा चाहिए अथवा व्यक्तिगत या किस प्रकार : व्यक्तिगत

५) सुचना का प्रयोजन: कार्यालयीन उपयोग हेतु

६) आवेदक दारिद्र्य रेखा के निचे है अथवा नहीं : नहीं

भाषा : हिंदी

| मि. भा. म. न. पा. | |
|---|---|
| सा. बां. विभाग | |
| आ. क्र. | 354 |
| दिनांक | |

स्थान : मुंबई

दिनांक: ०५ / ०४ / २०१८

मोबाईलन. : - ९५९४४४१३१५/८०८०२५६२५६

आवेदक के हस्ताक्षर

Haji.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./३४/2018

दिनांक :-२५ / ४ /2018

प्रति,
**श्री. हाजी शेख,**
**एच.आर.सी. भवन,**
**क्यू मंजिल,वेस्टन एक्सप्रेस हायवे,**
**हॉटेल अमर पॅलेस बाजूला,**
**मिरारोड (पू.)**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **1. जन माहिती अधिकारी, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडील दि. 12/04/2018 रोजीचे पत्र.**
**2. आपणांकडील दि. 05/04/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

जनमाहिती अधिकारी, सार्व. बांधकाम विभाग, मि.भा.मनपा यांनी आपणांकडील संदर्भित पत्र.क्र. 02 मधील मुद्दा क्र. 03 मिरा भाईंदर महानगरपालिका नगरसेवकांना प्रती महिना किती सॅलेरी दिली जाते यासंबंधित माहितीची आपणांस उपलब्ध करून देणेसाठी आपणांकडील पत्राची छायांकित प्रत नगरसचिव विभागामध्ये वर्ग केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस पुढीलप्रमाणे माहिती देण्यांत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सन्मा. नगरसेवकांना महानगरपालिकेमार्फत सॅलरी (पगार) देण्यात येत नाही. तथापी, शासन निर्णय क्र. संकिर्ण 2015/प्र.क्र.128/नवि-20, दि. 15/07/2017 नुसार सन्मा. नगरसेवकांना दरमहा रक्कम रुपये 10,000/- (अक्षरी दहा हजार मात्र) इतके मानधन निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका नगरसेवकांना रुपये 10,000/- इतके मानधन व प्रती सभा रुपये 100/- इतका सभाभता महानगरपालिकेमार्फत अदा करण्यांत येतो. नगरसेवकांच्या मानधनाबाबत शासन निर्णयाची प्रत सोबत जोडून देत आहोत. (एकुण पाने 01)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

२५/०४/१८

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Haji Shekh.docx

५९८
१०१०७११६

नगरसचिव विभाग
स.व./स.प./स प./आ क्र ९८
दिनांक : १९/५/१७ ...

राज्यातील बृहन्मुंबई व इतर महानगरपालिकांतील सदस्यांचे मानधन वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१५ / प्र.क्र.१२८ / नवि-२०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १५ जुलै, २०१७.

वाचा :-१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-१०९४/६१५/प्र.क्र.५८/नवि-२४, दिनांक ३०.०६.१९९५
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-१०९५/प्र.क्र.८७/९५/नवि-२४, दिनांक ०९.०१.१९९६
३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-१०९५/प्र.क्र.८७/९५/नवि-२४, दिनांक २४.०१.२००५
४) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकिर्ण-१०/२००१/प्र.क्र.१२५/नवि-२७, दिनांक १६.०८.२००१
५) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकिर्ण-२००४/४६८/प्र.क्र.८४/०४/नवि-२०, दिनांक २४.०१.२००५
६) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकिर्ण-२००७/१३२/प्र.क्र.३३९/नवि-२६, दिनांक १५.१०.२००८
७) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकिर्ण-२००९/प्र.क्र.१४८/नवि-२६, दिनांक २२.०१.२०१०

नगरसचिव

**प्रस्तावना:-**

राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिकांतील सदस्यांचे मानधन सन २००८ व इतर महानगरपालिकांतील (बृहन्मुंबई वगळून) सदस्यांचे मानधन सन २०१० मध्ये निश्चित करण्यात आले आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सदर सदस्यांचे मानधन वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७(अ)(१) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १९(अ) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त नमूद परिस्थितीत राज्यातील बृहन्मुंबई व इतर महानगरपालिकांतील सदस्यांचे मानधन (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्च लक्षात घेऊन) खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | महानगरपालिकांचे वर्गीकरण | बृहन्मुंबई व इतर महानगरपालिकांतील सदस्यांचे मानधन (मासिक) |
|---|---|---|
| १. | "अ+" वर्ग | रु.२५,०००/- |
| २. | "अ" वर्ग | रु.२०,०००/- |
| ३. | "ब" वर्ग | रु.१५,०००/- |
| ४. | "क" व "ड" वर्ग | रु.१०,०००/- |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०७१५११२९२२७५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Kailas M Badhan
Date: 2017.07.15 11:28:10 +05'30'

( कैलास बधान )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२) सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७) मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१३) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरचे शासन परिपत्रक विभागाच्या नागरीकांची सनदवर प्रसिध्द करण्यात यावे.
१४) निवडनस्ती (नवि-२०).